लोकमत

epaper.lokmat.com

कोल्हापूर, रविवार, दि. १५ ऑक्टोबर २०२३

२

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(Autonomous)



आंतरराष्ट्रीय गुंतवणूक सप्ताहानिमित्त विवेकानंद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सोमवारी विवेकाचा अर्थजागर करणारी रॅली काढली.

# विवेकानंद कॉलेजतर्फे अर्थसाक्षरतेची रॅली

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय गुंतवणूक सप्ताहानिमित्त विवेकानंद कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी विवेकाचा अर्थजागर करणारी रॅली काढली. गुंतवणूक सावधपणे करा, फसव्या योजनांमध्ये व उच्च परतावा देणाऱ्या जाहिरातीमध्ये न फसता सावधपूर्वक गुंतवणूक करा, हा संदेश या रॅलीद्वारे दिला.

शिवाजी विद्यापीठातील प्राध्यापक डॉ. विजय ककडे यांनी यावेळी मार्गदर्शन केले. विद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.आर. कुंभार, मराठी विभागाचे प्राध्यापक एकनाथ आळवेकर, डॉ. कैलास पाटील, डॉ. सोमनाथ काळे, प्रा. संदीप पाटील, प्रा. अण्णासो वसेकर व प्रा. अभिषेक चौगुले यांनी या रॅलीत सहभाग घेतला.

HEAD
DEPARTMENT OF ECONOMICS
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(AUTONOMOUS)

Scanned with OKEN Scanner

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(Autonomous)

२ पुण्य नगरी

शनिवार, १४ ऑक्टोबर २०२३

# अर्थसाक्षरतेची विवेक रॅली

**कोल्हापूर :** आंतरराष्ट्रीय गुंतवणूक सप्ताह ९ ते १५ ऑक्टोबर या कालावधीत साजरा केला जातो. या अंतर्गत विवेकानंद महाविद्यालयाच्या १२७ विद्यार्थ्यांनी विवेकाचा अर्थजागर करणारी रॅली काढली. यासाठी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, मराठी विभागाचे प्रा. एकनाथ आळवेकर, अर्थशास्त्र विभागाचे डॉ. कैलास पाटील, डॉ. सोमनाथ काळे, प्रा. संदीप पाटील, प्रा. आण्णासो वसेकर, प्रा. अभिषेक चौगुले यांनी सहभाग घेतला. प्रा. डॉ. विजय ककडे यांनी मार्गदर्शन केले.

.10.23

HEAD
DEPARTMENT OF ECONOMICS
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(AUTONOMOUS)

Scanned with OKEN Scanner

7/7/23

पुढारी ३

सोमवार, १७ जुलै २०२३

# लोकसंख्या नियंत्रणासाठी जनजागृती करणे आवश्यक : प्रा. जाधव

कोल्हापूर : भारतातील लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. लोकसंख्या नियंत्रण करण्यासाठी कायदा करण्यापेक्षा जनजागृती करणे, लोकांना चांगले आरोग्य, शिक्षण सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल अभ्यासमंडळाचे सदस्य प्रा. डॉ. रत्नदीप जाधव यांनी केले. विवेकानंद महाविद्यालयात भूगोल, समाजशास्त्र, अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ऑनलाईन व्याख्यानात बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. प्रास्ताविक भूगोल विभाग प्रमुख डॉ. जी. एस. उबाळे यांनी केले. पाहुण्यांची ओळख प्रा. आण्णासाहेब वसेकर यांनी करुन दिली. प्रा. एच. व्ही. चामे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. शुभांगी काळे यांनी केले. यावेळी डॉ. श्रुती जोशी, डॉ. कैलास पाटील, डॉ सोमनाथ काळे, डॉ. सुनील भोसले, डॉ. धीरज पाटील, डॉ. निशा मुगडे, डॉ. सिद्धार्थ घोडेराव उपस्थित होते.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

HEAD
DEPARTMENT OF ECONOMICS
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(AUTONOMOUS)

Scanned with OKEN Scanner

सकाळ

कोल्हापूर, सोमवार, १७ जुलै २०२३

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

# लोकसंख्या वाढीमुळे अर्थ, पर्यावरणावर ताण : डॉ. जाधव

कोल्हापूर, ता. १६ : 'लोकसंख्या वाढीचा परिणाम साधनसंपत्तीवर होऊन आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. लोकसंख्या वाढीचा परिणाम अर्थ, पर्यावरण, समाजावर होत आहे,' असे शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल अभ्यास मंडळाचे सदस्य प्रा. डॉ. रत्नदीप जाधव यांनी सांगितले

भूगोल, समाजशास्त्र, अर्थशास्त्र विभागातर्फे आयोजित ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

डॉ. जाधव म्हणाले, 'भारतात ६८ टक्के लोकसंख्या कार्यकारी आहे. यामुळे भारत झपाट्याने विकसित होऊन महासत्तेकडे वाटचाल करीत आहे. लोकसंख्या नियंत्रण करण्यासाठी कायदा करण्यापेक्षा जर आपण जनजागृती निर्माण करणे, लोकांना चांगले आरोग्य, शिक्षण सुविधा उपलब्ध करुन देणे, लहान कुटुंबाचे महत्त्व समजावून सांगणे आवश्यक आहे. स्त्री शिक्षणावरही भर देणे गरजेचे आहे.' प्राचार्य डॉ. कुंभार यांनी लोकसंख्या वाढीची कारणे, लोकसंख्या वाढीचे दुष्परिणाम, जागतिक लोकसंख्येचे वितरण यावर विवेचन केले.

भूगोल विभागप्रमुख डॉ. जी. एस. उबाळे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. आण्णासाहेब वसेकर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. प्रा. डॉ. शुभांगी काळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एच. व्ही. चामे यांनी आभार मानले. आयक्युएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी, डॉ. कैलास पाटील, डॉ. सोमनाथ काळे, डॉ. सुनील भोसले, डॉ. धीरज पाटील, डॉ. नीशा मुगडे, डॉ. सिध्दार्थ घोडेराव यांनी संयोजन केले.

17/07/2023

HEAD
DEPARTMENT OF ECONOMICS
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(AUTONOMOUS)

Scanned with OKEN Scanner